- न्याय-चातुर्य-कथा -

[-२-]

# नशिबाची परीक्षा

- आणि इतर कथा -

-२-

-७ आणे-




अमर ज्योति वाड़्मय

## 'अमर ज्योति वाङ्मय'

(१) ५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें, प्रस्तुत ('ज्योति-सामंत-स्मारक') संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

(२) प्रत्यक्ष कार्याला अवधि फार थोडा; कागद-छपाई-महर्गता-नियंत्रणें इत्यादींची प्रतिकूल परिस्थिती; पण असल्या अनेक अडचणींतून वाट काढून, वर उल्लेखिलेल्या पत्रकांत **कल्पिलेल्या एकूण अठरा पुष्पांपैकीं शेवटीं फक्त बारा पुष्पेंच** कां होईनात, तेवढी तरी बालक-जगाला सादर करणें आम्हाला शक्य होत आहे. या बारा पुष्पांपैकीं (तीन पुष्पें थोडीं अपूर्ण मुद्रित असल्यामुळें) **आज धनत्रयोदशीला आम्ही फक्त नऊ पुष्पेंच प्रकट करीत आहों. तीं उरलेलीं तीन, ५ डिसेंबर १९४४ रोजीं आम्ही बाल-रसिकांच्या हातीं देऊं शकूं, अशी आम्हाला खात्री आहे.**

आपल्यापुढें असलेल्या या पुष्पांचें चोखंदळ रसिक पालकांनीं एकदां अवलोकन केल्यावर—**आपल्या बालकांना तीं सर्व दृष्टीनें फार आवडतील, त्यांना उद्बोधक व साहाय्यक होतील,** अशी त्यांची खात्री होईल, यांत आम्हाला संदेह नाहीं.

(३) **उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें '**मनोरंजक**' व '**ज्ञान**' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें-१) '**शिशुश्रेणी**' (वय वर्षें ७ पर्यंत), (२) **बाल-श्रेणी**' (वय वर्षें १२ पर्यंत,) (३) '**किशोर श्रेणी**' (वय वर्षें १४,) व (४) '**कुमार-श्रेणी**' (वय वर्षें १७ पर्यंत) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

किशोर-श्रेणी ............................ न्याय-चातुर्य-कथा

[मनोरंजन]

— ३ —

# नशिबाची परीक्षा !

आणि

## इतर कथा

– लेखिक –

सौ. स्नेहल सामंत
पी. ए. ( मुंबई )

कु. कुसुम वि. गव्हाणकर
जी. ए. ( मुंबई )

रघुवीर सामंत संपादित

अमर

ज्योति वाङ्मय

[३]

मूल्य ७ आणे ] धनत्रयोदशी १८६६ [ प्रथमावृत्ति

असणें, भाषा तोंडीं न शोभणें, कोणाचा बांधला गुलाम नसणें, दुःखावर डागण्या देणें, जबानीला उलटणें, चार पैसे तोंडावर फेंकणें, आनंदांत गर्क असणें, एखाद्या बाबतींत वांधा आणणें, जबान पालटणें.

[ ३ ] जीव खालीवर होणें, मनाला घोर लागणें, धाय मोकलून रडणें, सार-सर्वस्व जाणें, कर्मधर्म संयोगानें होणें.

## II कथानक-कल्पना-कला, यांचा अभ्यास.

[ १ ] i ) आयतोबा, चिंतोपंत, व्यवहारे व रांगडे यांचे स्वभाव-विशेष दाखविणारीं वाक्यें शोधून काढा. ii ) राजे व प्रधान यांनीं कशा तऱ्हेनें नशीबाची परीक्षा घ्यायचें ठरवलें होतें. आधीं कोणकोणत्या गोष्टी ठरवून कसकशी योजना केली होती ?—iii ) चौघा कैद्यांपैकीं कोण अधिक योग्य प्रकारें वागला असें तुम्हाला वाटतें ?—कां ?—iv ) रांगड्यांना जास्त मोठे रोख बक्षिस देण्यांत राजेसाहेबांना काय दाखवावयाचें होतें ? v ) राजेसाहेबांचा निर्णय तुम्हाला योग्य वाटला कां ?—vi ) प्रधानजींचें चातुर्य कशामध्यें दिसतें ?—

[ २ ] i ) इंजिनिअर शेठजींशीं ज्या पद्धतीनें वागला ती योग्य होती कां ?—इंजिनिअर वाईट माणूस होता असें तुम्हाला वाटतें कां ?–ii ) इंजिनिअरनें लिहून घेतलेला कागद कोर्टांत चालला असतां का ?–चौकशी करा. iii ) शेठजींच्या वागणूकींत खरा फरक पडला असेल, असें धरून त्यांच्या कारखान्यांतील मजुरांनीं त्यांना पाठवलेलें एक आभारप्रदर्शक पत्र तयार करा. त्याचप्रमाणें त्या मजुरांनीं त्या इंजिनिअरला पाठवलेलें आभार-प्रदर्शक पत्र कल्पनेनें तयार करा.

[ ३ ] i ) 'संशयात्मा विनश्यति' असें म्हणतात, तें या गोष्टींतील कोणाला लागूं होईल ? कां ? ii ) या गोष्टींतील योगायोगानें घडणाऱ्या घटना कोणत्या आहेत ?

[ १-२-३ ] i ) प्रत्येक गोष्टींत मध्यें आंकडे येतात. त्यांचा अर्थ काय ? तसे तुकडे पाडण्यांत कोणता हेतू आहे ? त्यामुळें कसली सोय होते ? ii) या गोष्टींना अधिक चांगलीं नांवें शोधून काढा. iii ) छापलेला मजकूर नेहमींच शुद्ध नसतो. या पुस्तकांतील अशुद्धें शोधून काढा.

(किशोर-किशोरीस) **हितगुज**- ★ [ न्याय-चातुर्य-कथा १-२-३-४ ]

या कथांपैकीं प्रत्येक तुम्ही आवडीनें वाचाल, अशी मला उमेद आहे. मात्र एकच सूचना देऊन ठेवीत आहें. प्रथम मनो-रंजनासाठीं त्या वाचल्यात, कीं, मागाहून पुस्तका-शेवटीं जोड-लेल्या पुरवणी-परिशिष्टाचा उपयोग करून भाषेच्या-रचनेच्या व कल्पना-विचारांच्या दृष्टीनें त्या पुन्हा वाचून त्यांचा अभ्यास करा. त्यामुळें तुमचा फायदा झाल्यावांचून रहाणार नाहीं.

तुमचा-**संपादक**

"अमर ज्योति वाङ्मय"

(पालकांशीं) **खाजगी** ★

तुमच्या गोड बालकांच्या हातीं या गोष्टी हेतु-पुरस्सर देत आहें. या गोष्टी निर्मळ स्वतंत्र मुळींच नाहींत. त्यांतील मध्यवर्ती कल्पना अगर क्वचित् सगळी गोष्टच्या गोष्टहि तुमच्या पूर्वी वाचनांत आली असेल. पण आमची मुख्य दृष्टि रचना, मांडणी, भाषा इत्यादि बाबतींत बालकांवर संस्कार करण्याची आहे. त्या दृष्टीनें हें पुस्तक विकत घेऊन आपल्या बाळ-गोपाळांच्या हातीं देऊनच आपण संतुष्ट होऊं नये. नम्र विनन्ति अशी, कीं, त्यांनीं पुस्तकाशेवटच्या परिशिष्टाचाहि उपयोग केला आहे, कीं नाहीं तें पहावें. आपल्याला कांही सूचना कराव्याशा वाटल्या तर जरूर कराव्यात.

आपला नम्र,

**संपादक**

"अमर ज्योति वाङ्मय"

---

[ सर्व हक्क प्रकाशका-स्वाधीन ]

-: मुद्रक :-

**अनंत बा. देसाई**, एम्. ए.

लोयल प्रिंटिंग प्रेस,

१३-१९ हमाम स्ट्रीट,

फोर्ट, मुंबई.

-: प्रकाशक :-

सौ. **स्नेहल सामंत**, पी. ए.

चालक, 'अमर ज्योति प्रकाशन'

१४ बी. हरजीवनदास एस्टेट

व्हिन्सेन्ट रोड : दादर :

मुंबई १४.

प्रथम वर्षाची विशेष फायद्याची **'परिचय सवलत--'**

**या वर्षाच्या "एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५-१३-० होते.** चार आणे प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४-१३-० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून ( रु. ४-१३-०+०-४ ०=५-१-० ) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं हीं पुस्तकें, रु. ४-१२-० मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें नांवही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं.**

प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहाय्य करीत आलेल्या, आज करीत असलेल्या व पुढें करतील त्या सर्व शिक्षणतज्ञ स्नेही मंडळीची संस्था सदैव ऋणी राहील. विशेषत:, पुढील मंडळीचा " **घरची सहाय्यक मंडळी**" म्हणून उल्लेख करताना सस्थेला साभिमान आनंद वाटत आहे.

## आमचे ऋणानुबंधी—

श्री. **वासुदेव त्र्यं. यार्दी**, एम्. ए. बी. टी. ( प्रिन्सिपॉल, न्यू इंग्लिश स्कूल, वसई ), श्री. **गो. स. नणंदीकर**, बी. एस् सी. बी. टी. ( पुणें ); श्री. **शांताराम बी. सबनीस**, एम्. ए. बी. टी. ( बडोदें ); श्री. **तिमाप्पा ए. कामत**, बी. ए. बी. टी. Dip. Phy, Ed. ( मुंबई ); श्री. **मधुकर वा. धोंड**, एम्. ए. एलूएल्. बी. एस्. टी. सी. ( मुंबई ); श्री. **के. जी. कुळकर्णी**, बी. ए. बी. टी. ( मुंबई ); श्री. **ना. गो. तवकर**, बी. ए. एस्. टी. सी. [ प्रिन्सिपॉल, दादर विद्यामंदीर ]; डॉ. **मुकुंद दि. मनोहर** एम्. एस्सी. पी. एच्डी. [मुंबई]; श्री. **श्रीनिवास स. पाटकर**, बी. ए. एस. टी. सी. [ मुंबई ]; श्री. **व्ही. एच्. फाळके**, बी. एस्सी. बी. टी. [ नासीक ]; श्री. **एस्. एन्. मोकाशी**; बी. ए. बी. टी. [ मुंबई ] आणि इतर स्नेही.

'**अमर-ज्योति वाङ्मया**'ला आश्रय मिळवून देऊन, उत्तम लेखन साहाय्य करून, उपयुक्त व आवश्यक अशा नवीन प्रकाशनाबाबत कल्पना सुचवून वगैरे हस्ते परहस्तें जी. जी. सक्रीय मदत केली जाईल त्याबद्दल त्या त्या आस्थेवाईक हितचिंतकांची संस्था सदैव ऋणीच राहील.

चालक:—सौ. **स्नेहल सामंत**, पी. ए.

मुख्य संपादक: श्री. **रघुवीर सामंत**, बी. ए. बी. टी.

कचेरी:—अमर ज्योति प्रकाशन, १४ बी. हरजीवन एस्टेट, दादर.

# नशिबाची परीक्षा आणि इतर गोष्टी

[ परिशिष्ट. ]

## I भाषेचा अभ्यास.

**( अ ) खालील शब्दांचा व कल्पनांचा अर्थ व उपयोग लक्षांत घ्या—**

[ १ ] अचाट चीज, कुजबुजणें, निष्पन्न, तगडा जवान, प्रामाणिक कष्ट, भकास, करडा आवाज, तरणाबांड, प्रतिबंध, मुखत्यार, शोधकपणें, मुताटकी, ठेंचकळणें, सानंद, नुकसान भरपाई, कनवट, लहर, संधि, उपद्व्याप, परिस्थिती, मिणमिणती हलती ज्योत, पुरचुंडी, डारड्र, बोकणा, मचमच, लाडीगोडी, अजीजी, खरेखुरे, विकट हास्य, मुसक्या, ललकारी, तर्कवितर्क, योगायोग, पळपुटे, नाहक, चरफडणें, रोखठोकपणें, चिडका, आवाज, अचानक, गडगंज, टेवा, घुटमळणें, बेगमी, सुका ठणठणीत, प्रत्यय. ( २ ) सुरळीत, रोजमजुरी, तुटपुंज्या, आपमतलबी, चढेलपणा, चिंताग्रस्त, मढ्यासारखा, आगाऊ, खेंकसणें, वाकबगार, कडाडणें. कद्रू, चढेल, पुरेपूर, घुस्सा, गुरगुरणें, चांभारचौकशा, दिरंगाई, खुशामतीच्या स्वरांत, त्रागा, तपशील, हमी, ( ३ ) सर्वस्व, गुबगुबीत.

**( आ ) पुढील वाक्प्रचार म्हणी समजून घ्या—**

[ १ ] चार लोक म्हणतात तसें म्हणणें, एखादी गोष्ट एखाद्याकरवीं करणें, गयावया करणें, अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकणें, दया भाकणें, ' काय करणार ?–आमचं कपाळ ! ' काथ्याकूट करणें, ठाण देऊन बसणें, कोणाच्या अध्यामध्यांत नसणें, चांचपून पहाणें, भिस्त ठेवणें, रापूं लागणें, हृदयाचा लचका तोडून नेल्यासारखें वाटणें, धीर खचूं न देणें, एखाद्याला एखादी गोष्ट लखलाभ असणें, सांथ करणें, बसकण मारणें, दुःखाला पारावार नसणें, पृच्छा करणें, असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी.

[ २ ] एखाद्याची पत्राज ठेवणें. एखादी गोष्ट परवडत नसणें, एका-ऐवजीं छप्पन्न मिळणें, एखाद्या गोष्टीची नड असणें, एखाद्यापुढें नांगी टाकणें, पोटाची खळगी भरणें, एखाद्या गोष्टीचा आव आणणें, बुच-कळ्यांत पडणें, एखादा मनुष्य कुबेर असणें, सुसरीबाईची पाठ मऊ

# नशीबाची परीक्षा—

राजेसाहेब आपल्या सिंहासनावर बसले होते. प्रधानजीही, उजव्या बाजूला खालच्या पायरीवर, आदबीनें बसले होते.

तोंच, एकदम एक विचार येऊन, राजेसाहेब म्हणाले, " प्रधानजी, नशीब, नशीब म्हणतात त्यावर तुमचा विश्वास आहे का हो ?—"

" हो, हो तर !–नशीब ही एक अचाट चीज आहे जगांतली, नक्कीच ! " प्रधानजींनीं आपलें मत व्यक्त केलें.

राजेसाहेब त्यावर मोठ्यानें एकदां हंसले व मग म्हणाले—" वा: ! चार लोक म्हणतात, तसंच आपलं तुम्हीही म्हणतांहा, झालं !—त्याला पुरावा मात्र कांहीं एक देतां येणार नाहीं तुम्हाला."

" असं का बरं, खाविंद ? " प्रधानजी हसून म्हणाले, " मी आपल्याला अगदीं आजच्या आज पटवून देतों प्रत्यक्ष—अगदीं या क्षणींच, मला एक कल्पना सुचली आहे."

" असं ? " राजेसाहेबांनीं आश्चर्य व्यक्त केलें, " काय करून तुम्ही मला पटवून देणार हें ? "

प्रधानजी जागचे उठले, आणि थोडा वेळ राजेसाहेबाच्या कानांत कांहीं तरी कुजबुजले.

तें ऐकल्यावर, राजेसाहेब मोठ्यानें हसत म्हणाले, “ बरं, बरं !– चालेल ! त्यांतून कांहीं ना कांहीं निष्पन्न नक्कीच होईल !––लागा, अत्तांच्या आत्तांच कामाला लागा !––”

## २

त्या दिवशीं रात्रीं, चार निरनिराळ्या रस्त्यावर, चार निरनिराळ्या दर्जाचे गृहस्थ, सरकारच्या अधिकाऱ्यांकरवीं गिरफदार करण्यांत आले; व प्रधान--राजेसाहेबांपुढें त्यांना तात्काळ उभेही करण्यांत आलें.

“ खाविंद, आमची कांहीं चूक नाहीं.'' ते चौघे खात्रीपूर्वक म्हणाले.

त्यांतला जो सर्वांत तगडा जवान होता तो म्हणाला, “ मी प्रामाणिक कष्ट करणारा एक शेतकरी आहे. मला सोडून द्या ! ”

बाकीचे तिघे गयावया करून म्हणाले, “ हें काय आमच्या नशीबीं आलं आज ? ”

“ नशीब ? ” राजेसाहेब प्रधानजींकडे पाहून एकदां हंसून पुढें म्हणाले, “ नशीब तर खरंच ! ”

“ पण नशीब पुढेंच आहे अजून तुमचं ! ” प्रधानजींनीं राजे-साहेबांकडे उलट एक अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकून, त्या चौघांना म्हटलें.

“ पण सरकार”.... सारे पुन्हां दया भाकूं लागले.

“ बरं, बरं....त्याचा सारा निवाडा उद्यां सकाळीं करूं आम्ही ? ” राजेसाहेब करड्या आवाजांत त्यांना एकदम म्हणाले.

“ कोण आहे रे तिकडे ? ” तेवढ्यांतच आंत पाहून राजे उद्गारले.

कैद्यांना धरून आणणारे चारी पहारेकरी पुढें आले.

" यांचे वरले अंगरखे काढून घ्या ! नि अत्तांच्या अत्तां, ठरवलेल्या कोठडींत कैद करून ठेवा यांना ! " प्रधानजींनीं हुकूम सोडला.

राजेसाहेब व प्रधानजी दोघांकडे दुःखी चेहऱ्यानें एकदां पाहून, नशीबाला हात लावीत ते चौघे निघून गेले.

## ३

एका ओसाड भकास घराच्या, अगदीं अंधुक प्रकाश असलेल्या एका मोठ्या खोलींत, पहारेकऱ्यांनीं त्यांना सोडले; बाहेरून कुलुप लावण्यापूर्वी ते कैद्यांना म्हणाले, " सद्‌गृहस्थहो ! आमच्यावर मात्र रागावूं नका. तुम्ही निरापराध असाल; पण सकाळपर्यंत, येथें या काळोखांतच तुम्हाला उपाशी कोंडून ठेवा, अशी खुद्द महाराजांचीच आम्हाला आज्ञा आहे ! "

" नशीब !....दुर्दैव आमचं ! " तिघे सुस्कारे टाकून म्हणाले.

चौथा तरणाबांड मात्र बाजूला गप्प उभा राहून सारें ऐकत होता !

" या ऐसपैस खोलींत तुम्ही वाटेल तिथें फिरा; करतां येईल तें वाटेल तें करा ! तुम्हाला कसलाच प्रतिबंध नाहीं ! तुमचे तुम्ही पूर्ण मुखत्यार आहां ! अगदीं."

" अहो पण असल्या या ओसाड काळोख्या घरांत करणार काय आम्ही ? आमचं कपाळ ? " त्यांच्यातला कोणी एक श्री. आयतोबा, कुरकुरत म्हणाला, " झोंपायला गादी तरी आहे कां ? "

" हो तर—चौघांना चांगल्या चार गाद्या झाडून झटकून ठेवल्या आहेत ? " मुख्य पहारेकरी आयतोबांना हंसून म्हणाला.

" शोधा म्हणे ! शोधलं तर सांपडणार हो काय इथं ? शंकाच आहे ! पळायला वाट सुद्धां नाहीं सांपडायची ! " आयतोबांच्या शेजारचे श्री. चिंतोपंत संदेह म्हणाले.

" हं ! तेवढी मात्र ठेवली आहे. " पहारेकरी दार अर्धे ओढून घेत म्हणाले, " पण कृपा करा नि आल्यां परिस्थितींतून पळून मात्र जाऊं नका, एवढी विनन्ति ! सकाळपर्यंत आपल्याच मालकीच्या घराप्रमाणें तुम्ही सारे या खोलींत वागा ! झोपा, फिरा वाटेल तें करा ! ! आतां आम्हीहि जातों आमच्या घरीं ! "

" काय उपयोग, तुमच्याबरोबर या बाबतींत काथ्याकूट करून ! प्रत्यक्ष राजा विरुद्धच फिर्याद कोणाकडे नेणार आतां आम्हीं ? याक्षणीं, आमच्या उपाशीं पोटांना अन्न मिळणार आहे थोडंच ?" चिंतोपंतांपलीकडील तिसरे, श्री. व्यवहारे म्हणाले.

शेवटीं, दाराला कडी लावून हसत हसत पहारेकरी निघून गेले.

चौथा आतांपर्यंत हालचाल न करतां गप्पच जवळ उभा होता. त्याला तिघांनीं एकदमच विचारलें, "तुमचं हो नांव काय ?"

" मला खटपटराव रांगडे म्हणतात !" पण याहून कांहीं जास्त बोलण्याची त्याची इच्छाच दिसेना. तो तेथें दाराशींच उभा राहून, पुन्हा इंकडे तिकडे काळोखांत शोधकपणें पाहूं लागला.

## ४

ते तिघे दाराजवळून समोर पसरलेल्या खोलींत जाऊं लागले. पण—

" अग आई—!" चालतां चालतां ठेंचकळल्यामुळें, श्री. आयतोबा एकदां कुरकुर करून पुढें निघून गेले.

त्यांच्या त्या धडपडीकडे पाहून, त्यांना हंसतच, श्री. व्यवहारे पुढें जाऊं लागले; पण त्यांनाही तेथेंच धडपडण्याची पाळी आली. स्वतःला सांवरून, खालीं क्षणभर वांकून, थबकत ते स्वत-शींच म्हणाले, "शिंचा दगड आहे कीं काय मध्यें ? पण मरूं द्या ना ! चार सहा तासांचा तर

प्रश्न—येथें उगीच धडपडण्यापेक्षां, गपचूप गादीवर तरी अंग टाकावं !"

"बापेर ! भुताटकी तर नाहींना इथं ?" त्यांच्या मागून जाणाऱ्या चिंतोपंत संदेहांना तशीच ठेंच लागली, तेव्हां ते मोठ्यानें ओरडले. क्षणभर खोलीच्या मध्याजवळ ते थरथरत उभे राहिले; नि मग ते हळूच गादीकडे समोर जाण्याऐवजीं डाव्या बाजूच्या कोपऱ्याकडे आपलीं लट-पटतीं पावलें टाकत वळले.

५

खटपटराव रांगडे अजून जागच्या जागींच उभे होते. एकामागून एक, बाकीचे तिघे एकेच ठिकाणीं ठेंचकळलेले पाहून, ते सावधगिरीनें रांपत रांपतच पुढें निघाले.

हात दोन हात अंतरावर, पायाखालच्या जमिनीला, मध्यें रस्त्यांतच एक उंच टेंकाड होतें. चालतां चालतां, खरपटरावांच्याही पायाला तें लागलें; पण खालीं बसून, त्यांनीं तेथें हातांनीं रापून पाहिलें.

आश्चर्य म्हणजे ओल्या मातीचाच तो एक उंचवटा होता ! !

आपल्याला काय कीं दुसऱ्याला काय, उगीच कोणाला तेथें पुन्हां लागूं नये, म्हणून त्यांनीं हातानेंच तो उकरून टाकायला सुरवात केली; आणि उकरलेली अर्धवट ओली माती ते काळोखांतच गोळा करूं लागले.

तों काय आश्चर्य ? त्यांत त्यांना वाटोळ्या चकत्या हाताला लागल्या. एक, दोन, तीन, चार, पांच–होत्या एकंदर; त्या जडही होत्या. आपटून पाहिल्या, तर सोन्यासारखा आवाज आला; त्यांनीं त्या सानंद खिशांत घातल्या.

पण तरी पोटांतल्या भुकेनें ते व्याकुळ झाले होते ! 'सकाळ होईल तेव्हां होईल; तोंपर्यंत जमेल ती खटपट करावी.' हा विचार त्यांच्या मनांत ठाण देऊन होता !

## ६

श्री. आयतोबा ठेंच लागून धडपडले, नि कुरकुरत जे पुढें गेले, ते सरळ समोरच्या कोपऱ्यांत, गाद्या घातल्या होत्या तेथें; आणि कुणाच्या अध्यामध्यांत नसलेल्या, आपल्यासारख्या निरपराधी माणसाला पकडणाऱ्या जुलमी राजाबद्दल व आपल्या दुर्दैवाबद्दल, पुन्हां एकदां पुटपुटत कुरकुरून, त्यांनीं एका गादीवर अंग टाकलें.

पडल्यावर, पांच चार ठिकाणीं, त्यांच्या पाठीला कांहींतरी घट्ट घट्ट खुपलें. पण एक निश्वास टाकून, पायाखालचें पांघरून अंगावर ओढीत, ते डोळे मिटतां मिटतां म्हणाले, " आज काय नि उद्यां काय, आपल्या नशिबीं असेल तसंच सारं होणार !.... "

## ७

श्री. व्यवहारे त्यांच्या मागून गादीजवळ येऊन पोहोंचले !

त्यांच्या मनांत विचार चालले होते, " आपण निरपराध असतां, आपल्याला पकडण्यांत राजाच्या दूतांची नक्कीच कांहीं भयंकर चूक झाली असेल. न्याय–व्यवहार म्हणून कांहीं आहे कीं नाहीं जगांत ? उद्यां सगळं समजल्यावर, उलट राजाच आपली माफी मागेल. नुकसान-भरपाई करील. पण त्याचा आतां विचार करण्यांत काय अर्थ ? अन्न नाहीं तर नाहीं....झोंप तरी येते कां पहावं ! "

असें म्हणून ते गादीवर पडले. पण त्यांच्याही पाठीला खुपूं लागलें.

एक दोनदां ते या कुशीवरून त्या कुशीवर झाले; पण त्यांना कांहीं चैन पडेना.

ते लागलीच उठले. त्यांनीं बिछान्यावरची चादर काढली झटकली.

अंगाखालची दुलई काळोखांतच हातानें रापली. सत्रंजी व दुलई यांच्यामध्यें कांहीं असल्यामुळें, पाठ टेंकेल तेथें, कसले तरी चार पांच उंचवटे आले होते.

त्यांनीं दुलई पटकन् बाजूला केली; तेव्हां तेथें तीन चार ठिकाणीं, नाण्यांच्या लगडी करून ठेवलेल्या पाहून तर त्यांना आश्चर्यच वाटलें.

अधेल्यांसारखीं लहान लहान नाणीं होतीं तीं. सगळीं गोळा करून मोजलीं तेव्हां तीं वीस भरलीं. त्यांनीं आनंदानें तीं कनवटीला लावलीं व गादी तयार करून ते पुन्हां बिछान्यावर पडले.

## ८

श्री. चिंतोपंत संदेह, ठेंचकळल्यावर क्षणभर भुताटकींला घाबरले, थरथरले; व शेवटीं, जीव मुठींत धरून, दबकत दबकत, एक कोंपऱ्यांत येऊन पोहोंचले.

त्यांना अनेक प्रकारची भीति वाटत होती. हजारों शंकाकुशंका मनांत येत होत्या.

त्यांना मनांत वाटत होतें, " आपण कांहीं केलं नाहीं ! अगदीं निरापराध आहों ! तरीही, आज या भुताटकीच्या घरांत, आपण केवळ राजाच्या लहरीसाठीं रात्र काढणं, म्हणजे आपलं मरणच ! बरं समजा, त्यांतून सुटलों;....तरी हा लहरी राजा उद्यां सकाळीं आपल्याला सुळावर देखील कशावरून चढवणार नाहीं ?."

त्या कल्पनेनें मात्र त्यांच्या अंगावर शहारे उभे राहिले. आधारासाठीं त्यांनीं समोरच्या भिंतीला धरलें. तों काय ? त्या कोंपऱ्यांत पुष्कळशा लोखंडी वस्तू पडल्या होत्या.

त्यांनीं हातांनीं चाचपून पाहिल्या. तेथें कुदळी, खोरीं, पावडीं-घमेलीं अशीं अनेक प्रकारचीं हत्यारें होतीं.

८

पटकन् विचार आला, त्यांच्या मनांत, "भिंत फोडून बाहेर जायला कांहीं हरकत नाहीं. या भुताटकींत राहण्यापेक्षां किंवा सकाळीं सुळावर चढण्यापेक्षां आतांच पळण्याची तयारी करावी. आपण कुठें राहातो हें राजाला तरी कुठं ठाऊक आहे? पहारेकरीही घरीं गेले आहेत, बरी आहे ही संधी!"

पण मग एकदम बऱ्याच उंचीवर असलेल्या उघड्या खिडकीकडे त्यांचें लक्ष जाऊन ते आनंदून म्हणाले, "खणण्या-खोदण्याचे उपद्व्याप तरी कशाला आतां उगीच? या खिडकीखालीं कोनाडाही दिसतोय्. त्यांत पाय टाकावा, वर चढावं, नि,...अरे, पण हें काय?"

बहालापासून खालपर्यंत लोंबकळणारी एक जाड दोरी त्या खिडकीजवळच येत होती. "वा! दोरीला धरून व कोनाड्यांत पाय टाकून, खिडकींत पटकन् चढायचं व बाहेर उडी टाकायची!"

त्यांच्या मनांत तो विचार आला. आणि त्याप्रमाणें ते त्या दोरीला हात घालणार,-तोंच त्या दोरीच्या खालच्या टोंकाला कांहीं तरी जडजड लोंबकळतांना त्यांना दिसलें. ते पुन्हा घाबरले.

"तें काय असेल, आंत काय असेल? छे! हात न लावणंच बरं. पुन्हां, कदाचित् ती दोरी हलायची, एखादी घंटा वाजायची, पहारेकरी धावायचे नि आपण पळतां पळतां पकडले जायचों! त्यापेक्षां कोनाड्या-वरच सारी भिस्त ठेवावी नि खिडकींतूनच चटकन् पळून जावं!"

तोच बेत त्यांनीं कायम केला.

९

खटपटराव रांगड्यांच्या मनांत विचार आला, "राजानें आपल्याला उगीचच्या उगीच पकडून, कैदेंत तर ठेवलंच आहे! काय हेतू असेल

त्याचा तो असो. पण या काळोखांत काय आहे काय, तें तरी पहायला काय हरकत आहे? कांहीं मिळेल तर त्याचा आपण उपयोग करूं! नुसते झोंपण्यांत तरी काय अर्थ? त्यापेक्षां कांहीं खटपट करावी!"

आणि म्हणूनच दाराजवळच्या कोपऱ्यांतील भिंतीशीं ते हातानें रापूं लागले.

इकडे तिकडे थोडा वेळ रांपल्यावर, एक लहानसें खोकें त्यांच्या हाताला लागलें. त्यांनीं हळूं हळूं खोक्यावरही चांचपलें; त्यावर एक घासलेटचें डबडें होतें; जवळच एक भरलेली काड्यांची पेटीही होती.

रांगडे आपल्या मनाशींच हंसले व खालीं बसकण घेऊन, त्यांनीं काडीनें दिवा पेटवायला सुरवात केली. एक....दोन....तीन....एका-मागून एक, त्यांनी जवळ जवळ तीस-पस्तीस काड्या पेटवल्या. पण साऱ्या काड्या पेटीवर दोनदोनदां घासूनही ज्योत कांहीं पेटेना.

ते क्षणभर त्या परिस्थितीवर चिडले; पण त्यांनी आपली खटपट मात्र पुढें तशीच चालूं ठेवली.

शेवटीं, अगदीं शेवटची काडी एकदांची पेटली. वाऱ्याच्या झोतांत ती नीट संभाळून पेटती ठेवली; त्यांनीं दिवाही पेटवला. बारकीशी मिण-मिणती हलती ज्योत प्रकाशूं लागली.

त्या प्रकाशांत, त्यांना त्या खोक्यापाशींच, भिंतीवर एक लहानशी पुरचुंडी टांगलेली दिसली. त्यांनीं सोडून पाहिलें, त्यांत पांच मोहरा होत्या.

त्या खिशांत घालतां घालतां, ते हंसून म्हणाले, "राजा मोठा लबाड नि चतुर दिसतो!"

## १०

तो दिवा हातांत घेऊन, ते आतां सगळीकडे फिरून सारें शोधणार, तों त्याच वेळीं, चिंतोपंतांनीं खिडकींतून उडी टाकण्याचा धब्ब आवाज त्यांच्या कानावर आदळला.

रांगडे लगबगीनें त्या खिडकीकडे जाऊं लागले. पण त्याचवेळीं, खिडकींतून जोरानें आलेल्या वाऱ्याच्या झोतानें, त्यांच्या हातांतल्या मिणमिण्या डबड्याची ज्योत एकदम विझून गेली.

इतक्या खटपटीनें हातीं लागलेला पेटता दिवा असा लागलीच गेलेला पाहून, रांगड्यांना फार दुःख झालें; जणूं आपल्या हृदयाचाच एक लचका कोणी तोडून नेण्याचा त्यांना क्षणभर भास झाला.-

पण त्यामुळेंही धीर खचूं न देतां, ते त्या खिडकीपाशीं रांपत रांपत गेले. त्यांनांही त्या कोपऱ्यांत कुदळी–खोरीं पडलेलीं दिसलीं.

ते स्वतःशीं हंसून म्हणाले–" कुदळी–खोऱ्यांचा उपयोग घरांत नसतो करायचा. तीं वापरून घर बांधतां येईल, शेतांत धान्य पिकवता येईल ! पण इथें या खोलींत तीं निरुपयोगीच ! "

## ११

आणि मग, दुसरें कांहीं सांपडतें तर पहाण्यासाठीं, शोधायला म्हणून ते वळणार, तोंच त्यांना ती खिडकीजवळची बहालाला लोंबकळणारी दोरी दिसली. ते पुन्हां हंसले, " काय ? या दोरानें गळ्याला फांस लावून जीव देऊं ? वाः महाराज ! मी हजारों संकटांतही कधीं आजपर्यंत तितका निराश झालेलों नाहीं ! मग आज माझ्यावर आलेल्या या चार घटकेच्या संकटानें तरी मी कशाला घाबरूं ? "

रांगडे असें म्हणत आहेत, तोंच त्यांना दोरीच्या खालच्या टोंकाचीती मोठी पिशवी काळोखांत अंधुक दिसली. क्षणभर थबकून त्यानी ती दोरीपासून सोडवून हातांत घेतली.

ती मध्यम आकाराची होती. मध्यम वजनाची होती. त्यानीं तिचें तोंड सोडून आंत रापले, तों त्यांच्या हाताला दाणे लागले. एकदोन

दाणे त्यांनीं तोंडांत टाकून पाहिले. ते पोहे होते. आंत आणखी रापून पाहिलें, तो त्यांना वरच कसले तुकडे लागले. त्यांनीं एकाचा खका घेऊन पाहिला. खोबऱ्याचे तुकडे होते ते.

रांगड्यांना केवढा आनंद वाटला मनांत—"आपण खटपट केली, त्याचा फायदा झालाच शेवटीं आपल्याला! आपल्या कष्टाचं आपल्याला फळ मिळालं. आपण निदान उपाशी तरी राहत नाहीं आतां या रात्रींही!"

असा विचार करीत, ते बिछान्याच्या बाजूला पिशवीं घेऊन गेले.

## १२

श्री. आयतोबा डारडूर झोपले होते. श्री. व्यवहारे अजून या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत होते. त्यांच्या शेजारचे दोन बिछाने अगदीं रिकामे होते.

त्यांतल्याच एका बिछान्यावर रांगडे जाऊन बसले. त्यांनीं पिशवी उघडली; पोह्याचा एक बोकणा मारला व खोबऱ्याचा एक तुकडा पटकन् तोंडांत टाकला.

तसलें कष्टानें मिळालेलें खाद्य खातांना, त्यांना स्वतःबद्दल अभिमान वाटत होता; आणि शेजारी झोंपलेल्या दोघांबद्दल व आलेल्या परिस्थितीला घाबरून पळून गेलेल्या तिसऱ्याबद्दल, हसूं व कींव येत होती.

खातां खातां होणाऱ्या त्यांच्या तोंडाच्या मचमचीनें, शेजारीं झोंपेविना तळमळणारे श्री. व्यवहारे जागच्या जागीं उठून बसले.

"काय खातां हो?" त्यांनीं आश्चर्यानें रांगड्यांना विचारलें.

"काय म्हणजे? कष्टानें मिळवलेले पोहे—खोबरें!" शांतपणें खात खातच रांगडे म्हणाले.

## १२

" मग आम्हाला द्या की थोडे—आम्हीही उपाशी आहे ! " श्री. व्यवहारे लाडीगोडीनें म्हणाले.

" वा: ! मी कां द्यावेत तुम्हाला ? ज्या खोलींत तुम्ही कैद होऊन पडलां आहांत, त्याच खोलींत मीही कैद आहे ! तुम्ही झोंपून राहिला होतां, तेवढ्या वेळांतच मी कष्ट करून हें सारं मिळवलं ! " रांगडे जरा तोऱ्यांत म्हणाले.

## १३

" खरंच ! तेंही बरोबर ! व्यवहाराला धरूनच आहे अगदीं." श्री. व्यवहारे क्षणभरानें म्हणाले. पण मग लागलीच घुटमळत म्हणाले, " पोटांत तर मोठमोठ्यानें कावळे ओरडताहेत माझ्या ! काय करावं ? असं करतां कां ? माझ्याकडे हीं वीस नाणीं आहेत. त्यांतलीं कांहीं तुम्हाला देतों ! तुम्ही मला निम्मा हिस्सा द्या पोह्या–खोबऱ्यांतला."

" अगदीं सारीं वीसच्या वीस दिलींत, तरी नकोत मला ! " रांगड्यांनीं जरा मिजाशींतच पोह्याचा नवीन बोकणा मारला.

" असं नका करूं ! खरंच ! अगदीं हीं वीसच्या वीस नाणीं घ्या ! " व्यवहारे नाणीं रांगड्यांच्या पुढें ठेऊन, जरा अजीजीनें म्हणाले, " मला या क्षणीं पैशापेक्षां अन्नाचीच किंमत जास्त वाटते."

खळखळ वाजलेलीं नाणीं अगदीं समोर पडल्यावर मात्र, रांगड्यांचा बेत काळोखांतही जरा बदलला.

" नाहीं तरी आपल्याला कांहींच नव्हतं ! तिथं एवढं मिळालं. आतां व्यवहाराला धरूनच, एवढ्या मोठ्या किंमतीला निम्मे हिस्सा द्यायला काय हरकत आहे ? " असा विचार येऊन त्यांनीं श्री. व्यवहाऱ्यांच्या उपरण्यांत निम्मी पिशवी ओतली व सारीं नाणीं खिशांत घातली.

## १४

रांगडे–व्यवहारे दोघे आपापले पोहे–खोबरे खाऊं लागले.

त्यांच्या तोंडाच्या मचमचीनें श्री. आयतोबा जागे झाले.

गादीवर उठून बसत त्यांनीं विचारलें, " मित्रांनों, काय खातां ? आम्हाला तरी थोडं द्या ! "

" कष्ट केल्यावर असं खायला मिळतं, महाराज ! " रांगडे नवीन बोकणा मारून, हसत हसत आयतोबांना हेटाळून म्हणाले.

" व्यवहारच आहे मुळीं हा जगाचा ! " श्री. व्यवहारे, खोबऱ्याचा एक तुकडा तोंडांत भरीत, आयतोबांना समजावूं लागले. " मी पैसे मोजले आहेत छनछन या अन्नासाठीं....यांतले दगड सुद्धां मिळणार नाहींत तुमच्यासारख्या आळशी माणसाला ! "

श्री. आयतोबा एक सुस्कारा टाकून पुन्हा गादीवर अंग टाकीत म्हणाले, " बरं नशीब आपलं ! "

## १५

तेवढ्यांतच, आपल्या पुरचुंडींतल्या पोह्यामध्यें, रांगड्यांना खरोखरच दोन तीन लहान मोठे दगड लागले.

थोड्याशा उद्धटपणें त्यांनीं ते पटकन् बाहेर काढले व हसत हसत ते आयतोबांच्या अंगावर टाकून, रांगडे त्यांना म्हणाले, " अरेच्या ! पाहिलंत ! यांनीं आत्तांच म्हणायला नि या पोह्यांत तुमच्या नशीबानें हे खरेखुरे दगडच सांपडायला, अगदीं एक गांठ पडली ! घ्या ! आळशाच्या नशिबीं असलेले हे दगड ! आळशालाच ते लखलाभ असोत ! मी कशाला त्याच्या आड येऊं ? "

एवढें म्हणून रांगडे पुन्हां खदखदां हसूं लागले.

व्यवहाऱ्यांनींही आपल्या धोतरांत उरल्या पोह्याची पुरचुंडी बांधून, रांगड्यांच्या विकट हास्याला सांथ केली.

आपल्या अंगाजवळ रांगड्यांनीं उडवलेले दगड निमूटपणें गोळा करीत, आयतोबांनीं पडल्या पडल्या एक निश्वास टाकला; व ते खिन्नपणें म्हणाले, "हंसा बाबांनों....माझ्या नशीबीं हे दगडच असले, तर त्याला तुम्ही काय करणार नि मी तरी काय करणार?"

## १६

पण एवढें होत आहे, तोंच खोलीच्या दाराचें बाहेरचें कुलुप वाजलें.

दरवाजा उघडला गेला नि खूप मोठा प्रकाश-झोत खोलींत पडला.

त्यामुळें तिघांचेही डोळे क्षणकाळ एकदम दिपलें; ते तिघेही जागच्या जागीं चमकून गप्प झाले.

इतक्यांत दारांतून आवाज आला, "हं मित्रांनों, ज्याच्याजवळ जें असेल तें घेऊन, असाल तसे, लांब लांब उभे रहा!"

ते तिघेही पुन्हां दचकले, उभे राहिले; तोंपर्यंत, तीन चार झगझगीत प्रकाशाचे दिवे घेऊन, पहारेकरी पुढे आले.

त्यांच्या मागून, खुद्द राजेसाहेब, मग प्रधानजी व मुसक्या बांधलेले श्री. चिंतोपंत लाजेनें खालीं मान घालून पुढें आले.

पोह्याचा बोणका तसाच तोंडांत ठेऊन, रांगडे सभोंवतीं सारखे टकमका पहात होते.

भांबावलेले व्यवहारे, आपली धोतरांतली पुरचुंडी सांवरत, गोंधळून थोड्या अंतरावर उभे होते.

आयतोबांनीं मुठींतले खडे मुठींत लपवून धरून, लाजेनें खालीं बसकण मारली होती!

तेवढ्यांत राजेसाहेब स्वतःच म्हणाले, " आतांपर्यंत ज्याच्याकडे जें जें आलं असेल, त्याचा तो मालक आहे! प्रधानजी, पहा बरं प्रत्येकाला काय काय मिळालं तें ?"

आणि क्षणभर थांबून, राजे पुढें उतावळ्या स्वरांतच म्हणाले, " आणि तीं माणकं कोणाला मिळालीं, तें प्रथम पहा."

" माणकं ?" रांगडे, व्यवहारे व आयतोबा, तिघेही एकदम दच-कून आश्चर्यानें ओरडले.

## १७

" होय, मित्रांनों !" प्रधानजी हंसून तिघांकडे आळीपाळीनें पहात म्हणाले, " तुमचं नशीब पहायचं ठरवलं होतं आम्हीं ! पोह्याच्या पिशवींत पांचसहा माणकं मिसळलीं होतीं ! तीं कोणाच्या मालकीचीं झालीं आजच्या गडबडींत ? "

आयतोबा नुकतेच उभे राहिले होते; त्यांनीं हातांतली चकाक-णारी माणकें स्वतः प्रथमच चमकल्या दृष्टीनें पाहिलीं व माणकांसह आपला हात पुढें धरून, आनंदातिशानें पुन्हां बसकण घेतली.

व्यवहारे व रांगडे दोघे निश्वास टाकीत आयतोबांकडे पाहूं लागले; त्यांच्या दृष्टींत राग व दुःख भरलेलें दिसत होतें !

तेवढ्यांतच राजेसाहेब म्हणाले—" बरं ! वरतीच चार पांच हिरे टाकले होते, पोह्याच्या पिशवींत, ते कोणाला मिळाले ? "

" हिरे ? " रांगड्यांनी पुन्हा एक मोठ्यानें ललकारी ठोकली.

पण व्यवहाऱ्यांनीं आपली पुरचुंडी लगबगीनें सोडली; तेथें प्रकाशांत दोनतीन हिरे चमकले.

त्यांना फार आनंद झाला. पण आतां रांगड्यांनीं मात्र खालीं बसकण घेतली. त्यांच्या दुःखाला पारावार नव्हता.

१८

मग कांहीं वेळ, प्रधानजी खोलींत चौफेर पहात राहिले व चौकसपणें ठिकठिकाणीं वळून हंसत म्हणाले–"हा दाराजवळचा उंचवटा कोणी उकरला? सर्व गुल झाल्यावर, या खोक्यावर एक काड्याची पेटी ठेवली होती. त्यांत फक्त एकच पेटेल अशी काडी होती; ती ओढून इथला दिवा कोणी लावला? आणि ती दोरीला बांधलेली पोह्याची पिशवी प्रथम कोणी बरं हस्तगत केली?"

"हा सारा खटाटोप मी केला, महाराज!" लाजेनें मान खालीं घालून, रांगडे जरा रंजीस स्वरांतच म्हणाले.

"वाः! शाबास!" राजेसाहेब म्हणाले. "हा खरा मनुष्य!" आणि मग चिंतोपंताकडे वळून ते म्हणाले, "आणि हा मूर्ख मनुष्य पहा! नुसते तर्कवितर्क करून, या योगायोगानें पुढें आलेल्या चांगल्या परिस्थितींतूनही पळून गेला. तुम्ही सगळेच पळाला असतां, तरी या ना त्या ठिकाणीं, याच्याचसारखे सांपडला असतां, म्हणा! ठिकठिकाणीं पकडायला निरनिराळे सापळे करून ठेवले होते आम्ही. मला समाधान एवढेंच कीं, याच्याप्रमाणें सारेच, आल्या परिस्थितीला घाबरून पळणारे, पळपुटे नाहींत जगांत!"

१९

"पण आम्हां निरपराध्यांना असं नाहक पकडण्याचं तरी काय कारण होतं, महाराज?" रांगडे जागच्या जागींच जरा चरफडत म्हणाले.

" वा: ! तुम्हाला आमच्या राज्यांतले सर्वांत श्रीमंत करायचं ठरवलं होतं आम्ही !" प्रधानजी हंसून म्हणाले.

" म्हणजे ?" सगळे आश्चर्यानें एकदम ओरडले.

" म्हणजे एवढंच ! तुमच्या प्रत्येकाच्या नशीबाची परीक्षा पहायची होती आम्हाला !" राजेसाहेब एकदां मोठ्यानें हसले व पुढें म्हणाले, " या खोलीच्या जमिनींत अगदीं अर्ध्या हातावर हजारों मोहरा पुरून ठेवलेल्या आहेत. त्या कोंपऱ्यांतल्या कुदळी-खोऱ्यांनीं तुम्ही जमीन खणली असती, तर तें सारं धन अगदीं तुमचंच होणार होतं, अगदीं एका रात्रींच्या कैदेंत !"

## २०

थोडा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं.

" पण आम्हांला कसं स्वप्न पडणार त्याचं ? " रांगडे रोखठोकपणें, पण चिडक्या आवाजांत म्हणाले.

" आणि कैदेच्या कोठडींत धन पुरून ठेवलं असेल, अशी कल्पना करणं हें काय व्यवहाराला धरून कधीं होईल कां, महाराज ? " व्यवहारे निश्वास टाकून म्हणाले.

" पण मग यालाच तर नशीब म्हणतात ! " प्रधानजी हसत म्हणाले, " हेंच पहा ना ! नशिबानें तुम्हाला अगदीं अचानक, गडगंज संपत्तीचे धनी करण्याचा घाट घातला होता. पण प्रत्येक जण आपापल्या पद्धतीनें वागला ! नि शेवटीं तो ठेवा कोणाच्याच हातीं लागला नाहीं ! नशीब....नशीब बरं हें ! "

" संशयानें माझं नुकसान झालं ! मला पळून जाण्याचा मोह झाला. माफी करा, महाराज." चिंतोपंत खालीं पहात म्हणाला.

" माझ्या पद्धतीप्रमाणें मी खटपट अंगमेहनत केली ! अगदीं पोहे हातीं लागेपर्यंत धडपडलों." पण....रांगडे क्षणभर घुटमळून पुढें म्हणाले, " पोह्यांत हिरे–माणकं कशाला असणार, असा विचार कर-ण्यांत माझं काय चुकलं ? "

" मी व्यवहाराला धरून चाललों ! माझ्यापुरतं अन्न अशा ओसाड ठिकाणींही मिळवलं. आणखी माझ्या डोक्यांत दुसऱ्या कसल्या अचाट वेडया कल्पना नव्हत्याच ! " व्यवहारे मान खालीं घालून हसून म्हणाले.

" आणि तुम्ही काय केलंत हो ? " राजेसाहेब आयतोबांकडें पहात हसून म्हणाले.

" मनुष्य एक बाहुलं आहे ! तो या जगांत काय करूं शकतो, महाराज ? आपल्या नशीबांत असेल तसं व्हायचं ! दुसरं काय ? " आयतोबा मनापासून म्हणाले.

राजेसाहेब व प्रधानजी खो खो हसूं लागले.

## २१

आयतोबा भांबावून म्हणाले, " काय चुकलं माझं महाराज ? हे दोघेही मघां तसंच माझ्याशीं कठोरपणानें वागले ! "

" असेल, असेल ! " प्रधानजी हसून रांगडयाकडे पहात म्हणाले, " हे रांगडे आपल्या कष्टानें मिळालेल्या पोहे-खोबऱ्यावर खूष होऊन अधिक उद्धट झाले असतील ! निदान व्यवहाराला धरून वागले असतील हे दुसरे राजश्री ! पुढल्या बेगमीची पुरचुंडी यांनीं बांधून ठेवली ! म्हणूनच त्यांना माणके हिरे सांपडले ! तुमच्यापैकीं जास्तींत

जास्त खटपट करणाऱ्या रांगड्यांना मात्र, पोटांत भरायच्या पोह्यांवाचून अधिक फारसं कांहींच हातीं लाभलं नाहीं ! ”

तेवढ्यांत, राजेसाहेब चौघांकडेही एकदां सहास्य पाहून म्हणाले, “ जा, आतां सद्गृहस्थहो ! तसदीबद्दल माफी करा ! पुढें आल्या परिस्थितींतून भ्याडासारखं पळून न जातां, जे तिघे इथेच राहिले, त्यांच्यासाठीं, पंचवीस मोहरांची एक एक थैली ठेवली आहे दारांत; ज्यानें पोह्यांची पिशवी हस्तगत केली, या खोलींत दिवा लावला, वाटेंतला खड्डा निस्वार्थीपणें काढून टाकला, त्याच्यासाठीं शंभराची थैली ठेवली आहे, ती घ्यावी ! आणि येथें मिळालेल्या इतर वस्तू ज्याच्या त्यानें घरीं न्याव्यात.”

“ फळें, दूध, खाद्य कांहीं पाहिजे तें प्रत्येकानें पहारेकऱ्यांकडून घ्यावं व मग सरकारी गाड्यांतून आपापल्या घरीं जाऊन स्वस्थ झोंपावें !’ प्रधानजी साऱ्यांचा निरोप घेत हंसून म्हणाले.

## २२

सगळे निघून गेल्यावर प्रधानजी व राजेसाहेब मोठ्यानें हंसूं लागले.

‘ काय खाविंद, आतां त्या आयतोबांना काय म्हणणार तुम्ही ? ’ प्रधानजींनी पृच्छा केली.

‘ मोठा नशीबवान् खराच ! ’ राजेसाहेब विचार करीत म्हणाले. ‘सर्वांत आळशी मात्र तोच ! पण, असेल माझा हरी तर देइल खाटल्यावरी, असं म्हणणाऱ्यालाच शेवटीं माणकं मिळालीं ! मोठा चमत्कारिक योगायोगच !’

‘ बरं !—रांगडे व व्यवहारे यांच्याबद्दल काय मत झालं, सरकारांचं?’ प्रधानजींनीं पुन्हा हंसून विचारलें.

'केवळ व्यवहार व प्रामाणिक कष्ट यांच्या जोरावर, माणसाला जगांत फार पैसा मिळणं कठीण मला वाटतं! पण तसलीं माणसें उपाशीं कधींच रहाणार नाहींत, हेंही मला पटलं! अंधारांत थोडा वेळ तरी प्रकाश तयार करतील तीं! खरं कीं नाहीं?'

'हं! पण संशयानें मात्र सर्वांत जास्त नुकसान होतं! आहे त्या, आलेल्या परिस्थितींतही नीट रहातां येत नाहीं तें नाहीं नि नाशिबानें मिळण्यासारखं असेल, त्यापासूनही तो दूर पळतो! अगदीं सुका ठणठणीत रहातो!' प्रधानजी हसले.

राजेसाहेबही थोडा वेळ हसत होते.

## २३

'मग आतां सांगा, जगांत नशीब आहे कीं नाहीं, सरकार?' प्रधानजीच क्षणभरानें म्हणाले, 'आला ना माझ्या म्हणण्याचा प्रत्यय?'

'आहे! तुमचा तर्कवाद अगदीं बरोबर आहे!' राजसाहेब गंभीर शब्दांत म्हणाले, 'पण अजूनही मला नक्की सांगतां येत नाहीं!'

'म्हणजे?' प्रधानजींनीं आश्चर्य दाखवलें.

'कारण, जगांत नशीब असलंच–' राजेसाहेब हसून आपला निर्णय सांगूं लागले, 'तर पोह्या–खोबऱ्याच्या पिशवींतील हिऱ्या-माणकां-इतके, अगर ओसाड घराच्या जमिनींतील लाखो मोहराइतकं दुर्मिळ आहे तें! त्यापेक्षां खटपटरावांचं पोहे-खोबरंच अधिक मूल्यवान् व उपयोगी नव्हे का?'....

------

# प्रत्येकाच्या नडीचा प्रश्न !—

एक मोठे कारखानदार शेठजी होते. त्यांचा कारखाना इतका मोठा होता कीं, सारीं यंत्रें सुरळीत चालायला, तेथें जवळ जवळ हजार माणसें रोज मजुरीकाम करीत.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत मजूर खप खप खपत. नि कारखान्यालाही खूप फायदा होई. पण मजुरांची रोजमजुरी, इतक्या वर्षांत, अगदीं एका आण्यानेंही शेठजींनीं वाढवली नव्हती !

ते म्हणत—' माझ्या डोक्यानें, माझ्या पैशानें, मला हा एवढा फायदा होतो. मजूर अंगमेहनत करतात. पण त्यांना, मला योग्य वाटतो तो पगार मी देतोच. तेव्हां त्यांची मी कां म्हणून पत्राज ठेवावी ? त्यांचे पोट नसेल भरत, त्यांना मजुरी कमी वाटत असेल, परवडत नसेल, तर त्यानीं खुशाल सोडून जावं! एका मजुराठिकाणीं मला छपन्न दुसरे विकत घेतां येतील !—नड त्यांना आहे ! मला नाहीं ! ! '

बिचारे मजूर पोटासाठीं जीव मारून, तसल्याच तुटपुंज्या रोज मजुरींत काम करीत. त्यांचा कांहीं एक इलाज नव्हता पोटाच्या खळगीपुढें नि शेठजीच्या स्वार्थी आपमतलबीपणापुढें—

शेठजींचा हा चढेलपणा त्या गावांत चोहीकडे प्रसिद्धच होता. पण श्रीमंतांच्या पैशापुढें सारे नांगी टाकतात. नि गरजू मजूर तर बिचारे, निमूटपणें काम चालू ठेऊन, कशीबशी पोटाची खळगी भरतात!....

## २

असेच दिवसांमागून दिवस जात होते. एके दिवशीं शेठजींचा मुनीम घाबऱ्या घाबऱ्या त्यांच्याकडे आला नि सांगूं लागला, 'शेठजी आंपला कारखाना बंद पडला.'

'कारे? मजुरांनीं संप केला?' शेठजी जरा घाबरल्या मनानें, पण वरवर बेफिकीरीचा आव आणून, त्याला म्हणाले, 'मग दुसरे मजूर पहा!'

'छे छे! सारे मजूर तर कामावर वक्तशीर आले आहेत. पण यंत्रेंच एकाएकी बंद पडलीं आहेत.' मुनीम भयभीत मनानें म्हणाला.

'काय? मग यंत्रावर काम करणारे यांत्रिक कारागीर काय करता-हेत? फुकट पैसे खातात का पगाराचे?' शेठजी रागानें ओरडले.

'नाहीं! सकाळपासून तेही सारखा प्रयत्न करीत आहेत; पण कांहीं जमतच नाहीं!' मुनीम अधिकच अस्वस्थ होऊन म्हणाला, 'त्यांचा कांहींएक इलाज चालत नाहीं, त्याला ते तरी काय करणार?'

शेठजी, मोठ्या चिंताग्रस्त मनानें घाईघाईनें मोटारींत बसून स्वतःच कारखान्यांत गेले. खरें होतें सारें! सगळे उपाय हरले होते.

कारखाना एखाद्या मढ्यासारख्या अगदीं निश्चल झाला होता!

## ३

त्या मोठ्या गांवांतील दुसरे अनेक यांत्रिक कारागीर तीं बंद यंत्रें पाहून गेले. त्यांना शेठजींनी दुप्पट पैसे अगदीं रोख नि आगाऊ दिले.

पण सहा दिवस निघून गेले, तरी कारखाना कांहीं केल्या चालेच ना. सारे हतबुद्ध झाले होते.

सगळे मजूर तेवढे रोजच्या रोज येऊन जात. पण यंत्रें चालू नसल्यामुळें, ते दिवसभर बसत नि संध्याकाळीं घरीं निघून जात.

त्यामुळें तर शेठजी अधिकच बुचकळ्यांत पडले.

साऱ्या मजुरांची मजुरी अगदीं फुकट अंगावर पडत होती शेठजींच्या!

पैसा वाचवण्यासाठीं त्यांना 'घरीं बसा' म्हणावें, तर कारखाना केव्हां चालेल कोणास ठाऊक? नि रोज कारखाना चालल्यामुळें दिवसाचा दोन हजार फायदा होत असे, तोही गेले सहा दिवस, यंत्रें बंद, म्हणून बंद झाला होता!

## ४

शेवटीं, आपल्या मुनीमाला बोलवून, शेठजी जोरानें खेंकसले, 'पहात काय बसलांत शुंभासारखे? वाटेल त्याला वाटेल तिथून आणा! वाटेल तो खर्च करा! पण प्रथम यंत्रें चालू करा!!'

'एक उपाय आहे, शेठजी!' मुनीम घाबरत घाबरत म्हणाला. 'आपल्या कारखान्यांत पूर्वीं एक म्हातारा हुशार इंजिनिअर काम करत असे; तो इथेंच असतो. मोठा वाकबगार आहे तो! तो कांहीं करूं शकेल तर पहावं! तेवढं एकच राहिलं आहे आतां!'

'मग अजून गेलांत कां नाहींत त्यांच्याकडे?' शेठजी उलट त्याच्यावरच कडाडले, 'तुम्ही काय झोपा काढत होतां?'

'नाहीं, शेठजी!' मुनीम आदबीनें म्हणाला, 'मी त्याच्याकडेही गेलों होतों! पण तो यायलाच मुळीं कबूल नाहीं.'

'कां? असा कोण मोठा लॉर्ड फॉकलंड आला तो? त्याला पैसा नको असायला तो काय कुबेर आहे? विकत घ्या त्याला पैशानें!' शेठज़ी रागारागानें गुरगुरले.

'तो तेंच म्हणाला, शेठजी! म्हणाला, पैशाला विकला जाणारा मी कांहीं यांत्रिक माणूस नव्हे!' मुनीम जरा दबल्या आवाजांत पुढें म्हणाला, 'आणि तो पुढें म्हणाला, मी पुरेपूर ओळखतों तुमच्या कद्रू चढेल शेठजींना! माझा आजचा चार्ज शेठजींना परवडणार नाहीं जन्मांत!'

'काय? असं म्हणाला तो उर्मट मनुष्य?' शेठजींचा संताप अनावर झाला. 'काय एकेक माणसं असतात तरी! पण घेऊन घेऊन किती चार्ज घेईल तो असा?'

'स्वतः शेठजी आले माझ्याकडे, तरच सांगेन मी त्यांना माझा चार्ज. असं त्यानें सांगितलं! तेव्हां मग माझा नाइलाज झाला पुढें!' मुनीम बिचारा मान खालीं घालून म्हणाला.

५

क्षणभर शेठजींनीं मनाशीं विचार केला.

त्यांना व्यवहार-धोरण नि 'सुसरी बायीची पाठ मऊ' ठाऊक होती.

त्यांनीं मुनीमाला लागलीच मोटारींत घातले व स्वतःही रागारागानें आंत शिरून, ते त्या म्हाताऱ्या इंजिनिअरकडे स्वतः नाइलाज म्हणूनच गेले.

तो इंजिनिअर तसा गरीब होता. एका काळोख्या बोळांत त्याचें लहानसें घर होतें.

आपल्या घरीं स्वतः शेठजी येतांच, त्यानें त्यांचें शांतपणें स्वागत केलें.

पण शेटजी भयंकर घुश्शांतच होते. त्यांनीं एकदम त्याच्यावर मारा केला, “ काय हो ? आमच्या कारखान्याची दुरुस्ती करायचं तुम्ही नाकबूल केलेंत म्हणे ! हा काय व्यवहार झाला तुमचा ? ”

“ कोण म्हणतं असं ? ” तो इंजिनिअर शांतपणें म्हणाला, “ मी व्यवहार करायला सदा तयार आहे ! ”

“ मग सहा दिवस कारखाना बंद पडला आहे आमचा, तो कसा ? तुम्हाला बोलावूनही तुम्ही आला नाहीं. मी स्वतःच तुमच्याकडें यायला पाहिजे म्हणालांत म्हणे ! ही कसली तुमची अट ? तुमचा यंत्रें नीट करण्याचा धंदा आहे. मला नीट करून घ्यायचीं आहेत. पैशांत व्यवहार करायलाही मी तयार आहे ! एके काळीं तुम्हाला आमच्या कारखान्यानेंच अन्न दिलं आहे ! बिसरूं नका ! ”

“ असलीं भाषा तुमच्या तोंडीं शोभत नाहीं, शेठजी ! कोणी कोणाचा बांधला गुलाम नसतो ! माझा मी स्वतंत्र आहे ! ” इंजिनिअर शांतपणें म्हणाला, “ नि तुम्हाला समक्ष भेटायला बोलावलं, तें एवढ्या-साठीं, शेठजी, कीं....माझा आतांचा चार्ज तुम्हाला परवडणार नाहीं.”

“ तास दोन तासाचं....फार तर एक दिवसाचं काम असेल ! मग त्याबद्दल घेऊन घेऊन तुम्ही घेणार किती ? आंकडा बोला पटकन्. ” शेठजी ताठ्यांत बोलले.

‘ तो मी आधीं कांहींच सांगूं शकत नाहीं ! सारं सुरळीत झाल्यावर मी कळवीन. ’ इंजिनीअर तरीही शांतपणें म्हणाला.

‘ बरं बरं. तर मग कामाला लागा. ’ शेटजी चिडक्या आवाजांत म्हणाले, ‘ काम आधीं....मग पैशाचं बोलणं !’

## ६

'छे! छे!! असं कुठं झालंय्? आपण मला लेखी करार करून द्याल आधीं, तर विचार करतों मी! मी तसा तुमच्यासारख्याच्या नुसत्या शब्दांवर आतां विश्वास ठेवायला तयार नाहीं मुळींच!' इंजिनिअर बसल्या जागेवरून न उठतां, निश्चयानें म्हणाला, 'हा कबूली--कागद तयार आहे. वाचा नि खालीं तुमची सही करा!'

'काय कटकट?' अशा चेहऱ्यानें शेठजींनी तो वाचला.

'सांगितला जाईल तो दुरुस्ती-चार्ज शेठजी न कुरकुरतां देतील!' अशा कबुलीचा मजकूर होता तो. अगदीं नाइलाजानें शेठजी त्यावर सही करूं लागले!

तेवढ्यांत त्या इंजिनिअरनें मुनीमाला म्हटलें, 'सहा दिवस कारखाना बंद? मग खूपच नुकसान झालं असेल शेठजींचं?'

'अरे भाई, दरदिन दोन हजार तोटा! म्हणून तर म्हणतो लागलीच कामाला लागा!' आपल्या दुःखावरच्या डागण्या सहन न होऊन, शेठजी स्वतःच एकदम गुरगुरले.

'आणि हल्लीं हजार मजूर खपतात म्हणे! मग त्यांचा पगार?'

'आठ आणे दरमजुराप्रमाणें दररोज पांचशें रुपये! ती एक तोट्यांत भर!' शेठजी इंजिनिअरच्या चांभारचौकशांमुळें व दिरंगाईमुळें अधिकच रागावले!

'काय? एवढा फायदा होतो तरी अजून आठच आणे देतां मजुरी?' इंजिनिअर आश्चर्य व्यक्त करून म्हणाला.

'मग काय त्या मेंढरांना आठ रुपये मजुरी द्यायची?' शेठजी रागारागांत ओरडले.

'पण काय हो? आतां शेवटीं माझ्याकड कशाला आलांत?' तरी तो शांतपणें म्हणाला.

'तुमच्याशिवाय कोणाला जमणार नाहीं हें काम, म्हणून!' मुनीम खुशामतीच्या स्वरांत म्हणाला.

'खरं ना हें अगदीं?' इंजिनिअर हंसून म्हणाला.

'अरे भाई, हो....हो....हो! आतांपर्यंत या दुरुस्तीपायीं जवळ ज़वळ हजाराची उगीचच चटणी उडाली!' शेठजी रागानें ओरडले, "आतां कृपा करा नि प्रथम कामाला लागा. या चौकशीचा संबंध काय तुमच्या दुरुस्ती–कामाशीं!'

## ७

शेठजींनी सही केलेला कागद, इंजिनिअरनें खिशांत घातला; नि सौम्य हंसत, जागचा पटकन् उठून तो म्हणाला, 'अहो, जरा चौकशी करून ठेवली, अलीकडची पलीकडची, एवढंच! चला आतांच मोटारींतून जाऊं कारखान्यांत! यंत्रें नीट सुरू होईपर्यंत, मी परतणार नाहीं घरीं! पण आपला कबुलीचा लेखी कागद मात्र लक्षांत ठेवा! जबानीला मग उलटूं नका, शेठजी!'

शेठजींनी मानेनें कबूल केलें; त्यांनां जरा हायसें वाटलें.

इंजिनिअर आपली हत्यारांची पेटी, व आपला मजूर घेऊन, शेठजींच्या मोटारींतून कारखान्यांत गेला.

शेठजींबरोबरच, इंजिनिअर त्या कारखान्यांतलीं सारीं यंत्रें निरखून पहात फिरला. चार पांच ठिकाणचे उडालेले स्क्रू नवीन बसवलें; पांच सहा ठिकाणीं मजुराला हातोडयाचे ठोके मारायला मदत केली. सात

आठ ठिकाणीं मळसुत्रांची साफसुफी करून तेल सोडलें व नऊ दहा ठिकाणीं त्यानें नुसते हातानें रापलें एवढेंच.

असा जवळ जवळ दोन तास, तो त्या कारखान्यांत फिरत होता.

मग एकदां पुन्हां सगळे पाहून झाल्यावर, त्यानें विजेची मुख्य कळ दाबली; तो बाजूला झाला.

सात दिवस, एखाद्या मेलेल्या मढ्यासारखा पडून राहिलेला तो मोठा थोरला कारखाना, एकदम पुन्हा जिवंत झाल्यासारखा घडघडूं लागला !

शेठजी आनंदानें बेहोष झाले; इंजिनिअरकडे पाहून हंसले.

त्यांना त्यावेळीं मनांत वाटत होतें–'चार पैसे तोंडावर फेंकले कीं, वाटेल त्याला विकत घेतां येतं !'

इंजिनिअरही शेठजींकडे पाहून हळूंच हंसला व निमूट आपल्या घरीं निघून गेला.

त्याच्या मनांतही कांहीं तरी चाललें होतें. पण तें शेठजींना कसें समजणार ? ते आपल्याच आनंदांत गर्क होते.

## ८

दुसऱ्या दिवशीं शेठजींनीं मुनीमाला विचारलें, " अरे, त्या इंजिनिअरचं बिल आलं का ? "

"हो ! " मुनीम घाबऱ्या आवाजांत तोंडांतल्या तोंडांतच म्हणाला.

" किती चार्ज केलान् त्यानें ? " शेठजी मुनीमाच्या घाबरट चेहऱ्याकडे पहात म्हणाले.

" सहा हजार सात रुपये आठ आणे नऊ पै ! " मुनीम जीव मुठींत धरून खालीं पहात म्हणाला.

“ काय ? काय ?....म्हणतां काय ?....त्याला वेड बीड लागलं आहे कीं काय ? ” शेठजी संतापानें ओरडले, “ फक्त दीड तास इकडे तिकडे फिरला कारखान्यांत नि त्याबद्दल एवढा चार्ज ?....ही काय मोंगलाई आहे का ? त्याला देईल कोणता गाढव एवढी किंमत ? ”

“ आपणच, शेठजी ! ” मुनीम अधिकच गोंधळून म्हणाला, “ आपण त्याला लिहून दिलाय् नाहीं का तसा कागद, कालच--? ”

शेठजी त्या कागदाच्या आठवणीनें पुन्हां गोंधळांत पडले. त्यांचा अगदीं नाइलाज होता !

मग क्षणभरानें ते त्राग्यांत म्हणाले, “ चूक भूल झाली असेल त्याची ! त्याला प्रथम विचारा तसं ! नि बिलाच्या खुलासेवार तपशीलही पाठवायला सांगा त्याला, ताबडतोब ! ”

## ९

तिसऱ्या दिवशीं मुनीमांनीं शेटजींपुढें इंजिनिअरचा तपशील ठेवला; त्यांत लिहिलें होतें:—

“ चूक भूल कांहीं एक नाहीं. आपण मागितल्याप्रमाणें तपशील मात्र पाठवीत आहे.

“ आपण स्वतःच्या फायद्यासाठीं, कदाचित् मागून असा वांधा आणाल, आपली जबान पालटाल, या कल्पनेनेंच, आपल्याकडून काल मी लेखी कबूली घेतली आहे. तरी हा तपशील वाचल्यावर, लागलीच, मी सांगितल्याप्रमाणें रकमेची व्यवस्था करावी.

“ माझ्याकडील आपल्या लेखी हमीचा कायदेशीर उपयोग करायला मला लावूं नका, एवढी विनन्ति—

तपशील--

| | | |
|---|---|---|
| **कलम** | १—माझ्या बरोबरच्या मजुराची रोजमजुरी (आपल्याला योग्य वाटते, ती आठ आणे नव्हे; मला योग्य व मजुराला अगदीं जरूर ती.) | १-०-० |
| **कलम** | २—दोन चाकें नीट बसवलीं. (प्रत्येकीं आणे ८) | १-०-० |
| **कलम** | ३—सात स्क्रू नवीन बसवले. (प्रत्येकीं १ पैसा प्रमाणें) | ०-१-९ |
| **कलम** | ४—हतोड्याचे सहा ठोके मारले. (प्रत्येकीं २ पैसे) | ०-३-० |
| **कलम** | ५—यंत्रांत सोडलेल्या तेलाची किंमत | ०-४-० |
| **कलम** | ६—आपण मजुरांच्या नडलेल्या परिस्थितीचा नेहमीं घेतां तसलाच, आपल्या सात दिवस नडलेल्या परिस्थितीचा मी घ्यावयाचा फायदा. | ५००५-०-० |
| **कलम** | ७—दुसऱ्या कोणाला समजलें नाहीं, तरी कुठें हतोडे मारायचे, कुठें स्क्रू घालून पिळायचे, कुठें तेल सोडायचे, नि कुठें कुठें पहायचें, याबद्दलचें माझें अनुभवी ज्ञान— | १०००-०-० |
| | एकूण | ६००७-८-९ |

**ता. क.**—पैकीं फक्त ७—८—९ मजकडे पाठवून द्यावेत. उरलेली रु. ६००० ही रक्कम, माझ्या नांवें देणगी म्हणून जमा करावी व त्यांतूनच कारखान्यांतील हजार मजुरांना दोन आठवडेपर्यंत, हल्लीपेक्षां आठ आठ आणे जास्त मजुरी द्यावी.

'नडलेल्या मजुरांप्रमाणेंच, आपणही कधीं कधीं नडतो' हें साधें माणुसकीचें तत्व लक्षांत घेऊन, तुमच्या मजुरांची रोजमजुरी, तुम्ही कायमचीच एक रुपया केलीत, तर दुधांत साखर पडेल !"

तो सारा तपशील वाचल्यावर व त्या खालचा चाणाक्षपणें लिहिलेला ताजा कलम वाचल्यानंतर, शेठजींना जरा लाजल्यासारखें झालें.

त्यांनीं निमूटपणें त्या देणगीचा स्वीकार केला. व पुढें त्यांच्या चढेल वागणूकींत, थोडासा तरी फरक पडल्यावांचून राहिला नाहीं.

# भविष्य !–

एका श्रीमंत माणसाच्या शेजारीं एक गरीब मनुष्य रहात होता. एकदां एक ज्योतिषी आला व त्या गरीब माणसाला शेटजींच्या देखत म्हणाला, 'या तुमच्या शेजाऱ्यांचं सारं धन तुमच्या नशिबानें तुम्हाला मिळणार आहे!'

तें ऐकल्यापासून त्या चिकट शेटजीचा जीव खालीं वर होत होता. तेव्हां, त्या मनाला लागलेल्या घोराच्या समाधानासाठीं, त्यानें आपली सारी मिळकत विकून त्याचे रोख पैसे केले.

तेवढ्यानेंही समाधान न वाटून, त्यानें त्या साऱ्या पैशाचें एक मोठें थोरलें पांचू विकत घेतलें आणि तें पांचू तो आपल्या पागोट्यांत बांधून, ते पागोटें नेहमी बरोबर हिंडवूं लागला.

'आतां माझ्या भिकारड्या शेजाऱ्याच्या हातीं हें पांचू तरी कधींच लागणार नाहीं!' त्या चिकट प्राण्यानें आपल्याशींच समाधानाचा सुस्कारा टाकला.

## २

कांहीं दिवसांनीं हे चिकट शेटजी बोटींत बसून प्रवासाला निघाले. वारा जोराचा वहात होता. त्या सोसाट्यांत त्यांच्या पागोट्यानें जोरानें पाण्यांत बुडी मारली.

केवढा धक्का बसला शेटजींना ! ते धाय मोकलून रडूं लागले !

पण, स्वतःचें सारें गेलें म्हणून झालेल्या त्या दुःखांतूनही, शेटजींनी एक सुखाचा सुस्कारा टाकून म्हटलें—'माझं सारं सर्वस्व गेलं ! पण कांहीं का असेना, माझं पांचू गेलं तें आतां मला परत मिळत नाहींच ! मग ज्योतिष्याचं भविष्यही इथंच संपलं म्हणायचं !–कारण माझ्या भिकारड्या शेजाऱ्याला तर माझं धन नाहीं ना मिळत आतां ?'

## ३

आणखी कांहीं दिवस गेले.

शेटजींचा शेजारी बाजारांत गेला होता.

तेथें एक गुबगुबित मासा त्यानें विकत घेतला.

तो घरीं आला आणि आश्चर्य असें कीं, तो कापल्यावर, माशानें गिळलेलें शेटजींचें मूल्यवान् पांचू कर्मधर्मसंयोगानें माशाच्या पोटांतून त्या शेटजींच्या शेजाऱ्याला मिळालेंच.

शेटजींना ही गोष्ट समजायला पाहिजे होती.

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या !—
* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील !—
* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

## ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

**I न्याय-चातुर्य-कथा**

( किशोर श्रेणी )

१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा

२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा

३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा

४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

**II सत्यकथा—**

( कुमार श्रेणी )

१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा

२ शूरांचा गांव आणि इतर कथा

**III अभिनय-गीतें**

( किशोर श्रेणी )

१ गीत ज्योती

**IV दीर्घ-कथा**

१ कांहीं कमळें

**V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी**

( कुमार श्रेणी )

१ चार वीर

२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

| VI शास्त्रीय कुतूहल. | कुमार | VII वाङ्मयीन चर्चा. |
|---|---|---|
| १ माणसाचें शेंपूट. | श्रेणी | १ 'मी लेखक होणार.' |

-खानविलकर लिथो प्रेस; मुंबई २.